१] महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ कामगारांचा पुण्यातील मुख्य कार्यालयास घेराव.

२] सर्व मुख्य अधिकारी कार्यालयात अडकून पडले.

३] खरीपाची पेरणी त्वरीत करण्याची मागणी.

पुणे : १४ जुन १९८८

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या १२ ऊस मळयावरील व मुख्य कार्यालयातील २५,००० कामगारापैकी ३०० प्रतिनिधीनी आज दुपारी २.०० वाजल्यापासून पुण्यातील शेती महामंडळाच्या मुख्य कार्यालयास घेराव घातल्यामुळे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे सर्व मुख्य अधिकारी कार्यालयात अडकून पडले आहेत.

रात्री उशिरापर्यंतही हा घेराव चालूच होता. यात अडकून पडलेल्या अधिकाऱ्यामध्ये श्री एस. हबिबुल्लाह एम. आय. कार्यकारी संचालक, श्री प्र. तु. घोगले, मुख्य कार्यकारी [ प्रशासन], डॉ. एम. आर. थोरात मुख्य कार्यकारी [शे. व्य. ] , श्री एस. पी. शिंदे, मुख्य कार्यकारी [अभियांत्रिकी] श्री एस. एम. ए. रहिम, मुख्य कार्यकारी [वित्त], श्री के. अ. दुर्वे, कायदे सल्लागार/ सचिव, श्री आर. डी. जावळे, कामगार अधिकारी इत्यादींचा समावेश आहे.

खरीप पेरणीसाठी उत्कृष्ठ पाऊस पडला असता , सुर्यफूल ज्वारी, बाजरी इत्यादी खरीप घेण्याचे तसेच आडसाली उसाची लागवड करण्याची कोणतीही पूर्व तयारी महामंडळाने अद्यापि केलेली नाही. टायर्स, स्पेअर पार्टस, डिझेल अभावी ट्रॅक्टर्स ठप्प आहेत. तसेच कोणत्याही मळयावर बि बियाणे , खते औषधे, तसेच उसाचे बेणे नसल्यामुळे पुxx पेरणीस सुरूवात झालेली नाही. तेंव्हा खरीप पेरणी त्वरीत करावी व उसाचे लागवडीच्या मशागतीस सुरूवात करावी ही या घेरावामागील प्रमुख मागणी आहे.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ कामगार लढा कृतिसमितीचे अध्यक्ष श्री नानासाहेब गोरे जेष्ठ समाजवादी नेते, तसेच सरचिटणीस श्री मधुकर, भिसे, श्री मधुकर कात्रे, यांचे सहीने आज महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे कार्यकारी संचालकांना मागण्यांचे निवेदन देऊन त्यांचेशी प्रतिनिधीनी चर्चा केली. या चर्चेच्या वेळी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडे पैसा नसल्यामुळे कोणत्याही पिकाचा कार्यक्रम हाती घेता येत नाही., व कामगारांचा पगार करता येत नाही असे कार्यकारी संचालक श्री हबिबुल्लाह, यांनी शिष्टमंडळास सांगितले. यावर " साथी नानासाहेब गोरे यांनी

असे मांडले की, कोटयावधी रुपायाचे धान्य व वन शेती उत्पादन महामंडळाकडे पडून आहे. त्याची विक्री का करता येत नाही व सहकारी व खाजगी साखर कारखान्याकडील १५ कोटी रुपायाची थकबाकी का वसूल करता येत नाही याचा जाब क महामंडळाने दिला पाहिजे" ब-याच चर्चेनंतर कार्यकारी संचालकांनी संचालक मंडळाच्या परवानगी खेरीज कोणताही निर्णय घेत येत नाही असे सांगितल्यामुळे श्री किशोर पवार, यांचे नेतृत्वाखाली आलेल्या सर्व ३०० प्रतिनिधीनी या मागण्यांचा निर्णय लागेपर्यंत आम्ही महामंडळाच्या मुख्य कार्यालयात बसून रहाणार आहोत, तसेच मुख्य कार्यालयाबाहेर अधिका-यांना जाऊ देणार असा निर्णय जाहीर केला.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे अध्यक्ष, महसूल मंत्री, नामदार श्री विलासराव देशमुख असून संचालक मंडळावर सर्व सरकारी अधिकारी असून त्यामध्ये वित्त, पाटबंधारे, महसूल व वन, इत्यादी खात्याचे सचिवांचा समावेश आहे.

घेराव घालून बसलेल्या ३०० प्रतिनिधीमध्ये सर्वश्री डी. डी. चव्हाण, रं. ग. पंदरकर, विजय. ग. खोचे, खिवरकर, अविनाश आपटे, जी. बी. पौळ, दौलतराव पाटील, व्हि. के. कुलकर्णी, मधूकर भापकर, पोपट मिटकरी, चिंचवाडकर, इत्यादी कामगार प्रतिनिधींची भाषणे झाली. बड्या शेतक-यांना शेती महामंडळाची जमिन व पाणी फूकट देण्यासाठी व महामंडळाच्या जमिनी जाणूनबुजून पडिक ठेवण्यात येते असा आरोप कामगार प्रतिनिधीनी केला. आपल्या भाषणात साथी नानासाहेब गोरे जेष्ठ समाजवादी नेते म्हणाले की, कोटयावधी रुपायाच्या शेतमालाची नासधूस करणे, जमिनी पडिक ठेवणे हे देशद्रोही कृत्य आहे याचा जाब विचारण्यासाठी प्रथम कामगारांनी घेराव घालून बसण्याशिवाय मार्ग राहिलेला नाही.